जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८६०  दिनांक - ०९/१२/२०२३**

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा,पुणे शहर

## चरस हा अंमली पदार्थ जप्त करुन एका इसमांस केले जेरबंद

दिनांक ०९/१२/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक ०१ कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी सातपुते या त्यांचे अधिनस्त स्टाफ सह विमानतळ पो स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, इसम नामे अंकित शिरीष चुडासमा (मिस्त्री) रा.लोहंगाव पुणे हा त्याचे ओळखीचे लोकांना चरस हा अंमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची बातमी पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते यांना मिळल्याने त्यांनी त्याबाबत तात्काळ वरिष्ठांना कळविली असता,वरिष्ठांनी त्याबाबत खात्री करुन योग्य कायदेशिर कारवाई करणे बाबत मार्गदर्शन व सुचना दिल्या.

त्याप्रमाणे वरिष्ठांनी दिलेले सुचना नुसार पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी सातपुते व अधिनस्त स्टाफने विमानतळ पो स्टे हद्दीत इसम नामे **अंकित शिरीष चुडासमा (मिस्त्री) वय ३७ वर्षे रा. लोहंगाव पुणे** यांस पुणे लोहगांव येथील खेसे पार्क कडुन एअरपोर्ट कडे जाणारे रोडवरील कारमनची बिल्डींग सर्व्हे नंबर २५३ लोहगांव पुणे चे समोर सार्वजनिक रोडवर या ठिकाणहुन छापा कारवाई करुन ताब्यात घेवुन त्याचे कडुन एकुण किं.रु.५,७०,०००/-चा ऐवज त्यामध्ये ५४९ ग्रॅम चरस हा अंमली पदार्थ, ५,४९,०००/- चा एक ईलेक्ट्रॉनिक वजन काटा १०००/- रु चा एक मोबाईल फोन २०,०००/- कि.रु.चा ऐवज जप्त करण्यात आला असुन त्याचे विरुध्द विमानतळ पो स्टे येथे गुन्हा एन डी पी एस ॲक्ट कलम ८(क),२०(ब)(ii)(ब)२९ नोंदविण्यात आला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार,मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे,मा.सहा पोलीस आयुक्त,गुन्हे १, श्री सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस निरीक्षक श्रीमती अश्विनी सातपुते,पोलीस अंमलदार विशाल शिंदे, योगेश मोहिते,मनोज कुमार साळुंके, मारुती पारधी, पांडुरंग पवार, राहुल जोशी, ज्ञानेश्वर घोरपडे , प्रविण उत्तेकर, विशाल दळवी, संदिप शिर्के , संदेश काकडे, नितेश जाधव, सचिन माळवे, यांनी केली आहे.